**कृपया प्रसिध्दीसाठी** **24 ऑक्टोबर 2008**

## राम नाईक यांच्या कुष्ठपीडित सशक्तिकरण अर्जाबाबत राज्यसभेत अहवाल सादर

**मुंबई, शुक्रवार :** "कुष्ठपीडितांना प्रति व्यक्ति रु. 2,000/- प्रति मास निर्वाह भत्ता द्यावा, सर्व वैद्यकीय सुविधा शासनाने त्यांच्या निवासी वस्त्यांतच मोफत द्याव्यात, पाणी, वीज, आदी नागरी सुविधाही त्यांच्या वसाहतींना मोफत देण्यात याव्यात आणि त्यांच्या मुलांचे पदवीपर्यंतचे शिक्षणही सरकारने मोफत द्यावे, अशा महत्त्वाच्या शिफारसी असलेला अहवाल राज्यसभेतील विनंती अर्ज समितीचे अध्यक्ष श्री. एम्. व्यंकैया नायडू यांनी आज राज्यसभेत सादर केला, अशी माहिती माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी आज मुंबईत एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

वैद्यकीय, सामाजिक व आर्थिक सशक्तिकरणासाठी श्री. राम नाईक व कुष्ठपीडितांसाठी सेवाकार्य करणारे जागतिक कीर्तिचे डॉ. पी.के. गोपाल (अध्यक्ष, आयडीया इंडिया), डॉ. शरद गोखले ( इंटरनॅशनल लेप्रसी युनियन), श्री. उदय ठकार (कुष्ठरोग निवारण समिती, पनवेल), श्री. शांताराम भोईर ( महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटना) आणि श्री. भिमराव मधाळे (संजय नगर रहिवासी संघ, बोरीवली ) यांनी 5 डिसेंबर 2007 रोजी राज्यसभेकडे खासदार श्री. वेदप्रकाश गोयल यांच्यामार्फत विनंती अर्ज सादर केला होता. राज्यसभा अध्यक्षांनी तो अर्ज स्वीकारुन पुढील कारवाईसाठी विनंती अर्ज समितीचे अध्यक्ष श्री. एम. व्यंकैया नायडू यांच्याकडे पाठविला. समितीसमोर सर्व अर्जदारांची 10 जून 2008 रोजी साक्ष झाली. त्यानंतर समितीने मुंबई, हैदराबाद, तिरुपति, नेलोर, चेंगलपट्टी आणि चेन्नई या शहरांतील कुष्ठपीडितांच्या वसाहतींना भेटी दिल्या. विविध स्वयंसेवी संस्था, राज्य सरकारे आणि महापालिका यांच्याशी चर्चा करुन समितीने आज 24 ऑक्टोबर रोजी आपला अहवाल राज्यसभेत सादर केला.

यासंबंधी अधिक माहिती देताना श्री. राम नाईक म्हणाले, " कुष्ठपीडितांना वाळीत टाकून त्यांची अहवेलना केली जाते, त्यांना उदरनिर्वाहासाठी कोणताही व्यवसाय उपलब्ध नाही. कुष्ठरोग संसर्गजन्य नाही आणि उपचाराने बरा होतो हे सिध्द झाल्यावरही जवळ-जवळ 16 कायदे असे आहेत की ज्यांमुळे कुष्ठपीडितांना सन्मानाने जगता येत नाही. ही परिस्थिती बदलावी तसेच कुष्ठपीडितांचे सबलीकरण करण्यासाठी राष्ट्रीय धोरण तयार व्हावे असे अभिमत कुष्ठपीडितांसाठी काम करीत असताना माझ्यासह अनेकांचे बनले. या प्रकरणी सरकार दरबारी प्रयत्न केल्यावरही सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने आम्ही राज्यसभेला विनंती अर्ज करण्याचा निर्णय घेतला होता."

सुरवातीला दिलेल्या शिफारसीव्यतिरीक्त विनंती अर्ज समितीने पुढील महत्त्वाच्या शिफारशी केल्या आहेत :- 1) देशातील सर्व कुष्ठपीडित वस्त्यांची पाहाणी करण्यात यावी. सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालय आणि आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय या प्रकरणी एकमेकांवर जबाबदारी ढकलत असतात. त्यामुळे कुष्ठपीडितांच्या सशक्तिकरणासाठी राष्ट्रीय कुष्ठरोग धोरण ठरविण्यात यावे; 2) केंद्रात आणि विविध राज्यांमध्ये कुष्ठरोगासंबंधी अनेक कालबाह्य कायदे आहेत. त्या सर्वांची पाहाणी करुन त्यामध्ये समयानुकुल सुधारणा करण्यात यावी; 3) कुष्ठरोगासंबंधी अजूनही सर्वसामान्य जनतेत अज्ञान व गैरसमज आहेत. ते दूर करण्यासाठी प्रबोधनाचे कार्यक्रम हाती घेऊन सरकारतर्फे माहितीपट काढण्यात यावेत; 4) कुष्ठरुग्णाकडे 'सामाजिक कलंक' म्हणून पाहण्यात येते. 'कुष्ठरोगी' किंवा तत्सम शब्द वापरुन त्यांची अवमानना केली जाते. ती दूर करण्यासाठी कुष्ठपीडित व्यक्ति असे संबोधन करण्यात यावे; 5) कुष्ठपीडितांच्या समस्या केवळ सरकारी उपायाने संपणार नाहीत, तर त्यासाठी सर्वांनीच प्रयत्न केले पाहिजेत. भारतीय संस्कृतीच्या 'मानव सेवा हीच ईश्वर सेवा' या उक्तीनुसार सर्वांनीच कुष्ठपीडितांना मदत करावी.

विनंती अर्ज समितीचे अध्यक्ष श्री. एम. व्यंकैया नायडू व अन्य खासदार सदस्यांनी ज्या आस्थेने व तत्परतेने राज्यसभेला अहवाल सादर केला त्याबद्दल श्री. राम नाईक यांनी त्यांचे आभार मानले. केंद्र व राज्य सरकारे अधिक विलंब न लावता अहवालातील शिफारसींची अंमलबजावणी करतील, अशी अपेक्षा श्री. नाईक यांनी व्यक्त केली.

**(कार्यालय सचिव)**